मनोरंजनासह प्रबोधनासाठी... दैनिक epaper.rayatsamachar.com

# रयत समाचार

खिचों न कमानों को, न तलवार निकालो, जब तोप मुकाबिल हो, तो अख़बार निकालो - अकबर इलाहाबादी

संपादक : भैरवनाथ वाकळे | महाराष्ट्र, गोवा, कर्नाटक राज्यात एकाचवेळी प्रसिध्द होणारे दैनिक

● RNI No. MAHMAR/2011/40847 ● वर्ष १३ वे ● अंक २९९ वा ● गुरुवार, ता.१ मे २०२५ ● www.rayatsamachar.com ● पाने ४ ● मूल्य रु. ४.००

लवकरच...! शुभारंभ
दैनिक नमो संघराज
सर्व सामान्यांचे हक्काचे व्यासपीठ
संपादक बाबा जाधव
www.namosanghraj.com Gmail id : namosanghraj@gmail.com
कार्यालय : पारगल्ली,माळीवाडा,अहिल्यानगर, मो. ९४२२२२२५४६, ७०२०५८१२०२

रयत समाचार पोर्टल Scan QR Code
रयत समाचार चॅनल Scan QR Code
इंग्रजी रयत समाचार वाचण्यासाठी Scan QR Code

रावसाहेबचा चहा, एकदा पिऊन पहा!
कोतवाली पोलीसस्टेशन शेजारील सुप्रसिध्द
जगदंबा टी सेंटर
चहा, कॉफी, लेमन टी
शाखा नं.१- माणिक चौक, अ.नगर
शाखा नं.२- वसंत टॉकीजजवळ, भोला पान सेन्टर शेजारी, अ.नगर
प्रो.प्रा. रावसाहेब ठोंबे
97655 58585

सर्वोच्च न्यायालयाने प्रशासनाच्या मनमानी कारवायांना लगाम घालण्यासाठी

## कठोर व नागरिकहिताचे मार्गदर्शक तत्त्वे केली निश्चित- विजय कुंभार



### कोणत्याही अनधिकृत बांधकामास व्यवसाय परवानगी न देण्याचे निर्देश

**पुणे । प्रतिनिधी**

मा. सर्वोच्च न्यायालयाने अनधिकृत बांधकामांवर कारवाई करताना दिलेल्या आदेशांचे पालन करण्याचे निर्देश शासनाने प्रशासनाला दिले आहेत. या आदेशांचे पालन करण्याबाबत सर्व जिल्हाधिकारी, महसूल अधिकारी, व अन्य संबंधित संस्थांना सक्त ताकीद देण्यात आलेली आहे, अशी माहिती आरटीआय कार्यकर्ते विजय कुंभार यांनी दिली. अधिक माहिती देताना ते म्हणाले, सर्वोच्च न्यायालयाने प्रशासनाच्या मनमानी कारवायांना लगाम घालण्यासाठी अत्यंत स्पष्ट, कठोर व नागरिकहिताचे मार्गदर्शक तत्त्वे निश्चित केली आहेत. त्याचे मुख्य मुद्दे असे, अनधिकृत बांधकामावर कारवाई करण्याआधी देणे अनिवार्य आहे. १५ दिवसांची मुदत दिल्याशिवाय कोणतेही बांधकाम पाडता येणार नाही. नागरिकांना त्यांच्या बाजूने वैध प्रतिसाद सादर करण्याचा, किंवा अपील करण्याचा संधी मिळायलाच हवी. महिलांना, वृद्धांना व मुलांना रातोरात रस्त्यावर फेकणे हे अमानवीय. नोंदणीकृत टपालाद्वारे व संबंधित इमारतीवर चिटकावून नोटीस देता येईल. नोटीसची माहिती जिल्हाधिकारी कार्यालयास डिजिटल स्वरूपात ईमेलद्वारे कळवणे आवश्यक. डिजिटल पोर्टलवर संपूर्ण प्रक्रिया अपलोड करणे आवश्यक. ३ महिन्यांत व्यवस्था तयार करणे. संबंधित व्यक्तीला वैयक्तिक सुनावणीची संधी अनिवार्य. सुनावणीची नोंद ठेवणे आवश्यक. सर्व बाजूंचे म्हणणे विचारात घेऊनच आदेश द्यावा. बांधकाम पूर्णतः किंवा अंशतः नियमबाह्य असल्यास कारण स्पष्ट करावे. विध्वंस टाळण्याचे अन्य पर्याय ( इत्यादी) का अमान्य, हे स्पष्ट करणे आवश्यक. अंतिम आदेश अंमलात आणण्याआधी किमान १५ दिवसांची मुदत द्यावी. त्या काळात अपील दाखल करता येईल. बांधकाम स्वतः हटवण्याची संधी दिली पाहिजे. संपूर्ण विध्वंसाची व्हिडीओ रेकॉर्डिंग व पंचनामा अनिवार्य. विध्वंस अहवाल महापालिका आयुक्ताला ईमेलद्वारे पाठवावा व पोर्टलवर दाखवावा. न्यायालयीन आदेश पाळले नाहीत तर संबंधित अधिकाऱ्यांवर व वैयक्तिक नुकसानभरपाईची जबाबदारी ठरवली जाईल. कोणत्याही अनधिकृत बांधकामात व्यवसाय परवानगी न देण्याचे निर्देश. परवाना देणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई. बँका/संस्था शिवाय कर्ज मंजूर करणार नाहीत.



## मंत्री विखेंसह ५४ जणांवर फिर्याद दाखल

# ८८,६१२,२०६.०० अपहार

### शेतकऱ्यांना पैसे दिलेच नसल्याचा आरोप

**श्रीरामपुर । शफीक बागवान**

राज्यातील महायुती सरकारमधील मंत्री अडचणीत सापडले आहेत. मंत्री कोकाटे, धनंजय मुंडे यांच्यानंतर आता राज्याचे जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील अडचणीत आले आहेत. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानंतर विखे पाटील यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. राधाकृष्ण विखे पाटील यांच्या सहकारी साखर कारखान्यात घोटाळा झाल्याचा आरोप करण्यात आला आहे. त्यामुळं राजकीय वर्तुळात एकच खळबळ उडाली आहे. मंत्री राधाकृष्ण विखे व माजी मंत्री अण्णासाहेब मस्केंसह ५४ जनांवर फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. साखर कारखाना कर्जमाफी प्रकरणात ९ कोटींच्या अपहार प्रकरणी लोणी पोलीस ठाण्यात हा गुन्हा दाखल झाला आहे. शेतकऱ्यांच्या नावे राष्ट्रीयकृत बँकांकडून कर्ज घेऊन शेतकऱ्यांना वितरित न केल्याचा आरोप या सर्वांवर ठेवण्यात आला आहे. सन २००४- २००५ आणि २००७ साली अपहार केल्याचे दाखल फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानंतर विखे यांच्यासह ५४ जणांवर भादंस कलम ४१५, ४२०, ४६४, ४६५ कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला. नेमकं प्रकरण आहे तरी काय? राज्याचे मंत्री राधाकृष्ण विखे यांच्या अधिपत्याखाली असलेल्या विखे साखर कारखान्याने सन २००४-०५ मध्ये युनियन बँक व बँक ऑफ इंडिया या दोन राष्ट्रीयीकृत बँकांकडून सुमारे नऊ कोटी रुपयांचे कर्ज ऊस लागवड बेसल डोसकामी घेतले होते. सभासदांसाठी आलेले हे कर्ज देताना बँकांनी ज्या अटी घातल्या होत्या, त्यात प्रामुख्याने ही रक्कम शेतकऱ्यांना धनादेशाद्वारे द्यावी किंवा त्यांच्या खात्यात सरळ भरणा केला जावा, असे म्हटले होते. मात्र, या रकमेचे वाटप सभासद शेतकऱ्यांना कधीच केले गेले नाही. या रकमेचा वापर कारखान्याने मर्जीप्रमाणे केला व त्याची माहितीसुद्धा शेतकऱ्यांसह कोणालाही दिली नाही.

सन २००४ ते २००७ या काळात राधाकृष्ण विखे-पाटील राज्यमंत्री होते. ते कारखान्याचे संचालकही होते. २००९ मध्ये राज्य सरकारने शेतकऱ्यांसाठी 'कृषी कर्जमाफी योजना' आणली. कृषीसंबंधित कोणत्याही संस्था किंवा सोसायटऱ्यांना ही योजना लागू नव्हती. यादरम्यान राधाकृष्ण विखे-पाटील हे राज्याचे कृषिमंत्री होते. त्यांनी सत्ता व अधिकारांचा गैरवापर करून दोन्ही बँकांना शासनाकडे कर्जमाफीचा प्रस्ताव दाखल करण्यास भाग पाडले, दोन्ही बँकांनी राज्य सरकारकडे नऊ कोटी रुपयांचे कर्जमाफीचे प्रस्ताव पाठविले. ज्या शेतकऱ्यांना कर्जवाटप झाल्याचे दाखविण्यात आले होते, त्यांची यादीही बँकांनी सादर केली होती, असे फिर्यादीत म्हटले आहे. सुरुवातीला राहता येथील प्रथमवर्ग न्यायदंडाधिकाऱ्यांनी कारखान्याच्या संचालक मंडळाविरोधात गुन्हा दखल करून तपास करण्याचा जो आदेश दिला होता, तो उच्च न्यायालयाचे संभाजीनगर खंडपीठाने रद्द ठरविला होता. खंडपीठाच्या आदेशाविरोधात आम्ही सर्वोच्च न्यायालयात दाद मागितली व राहाता न्यायालयाचा आदेश कायम ठेवण्याची विनंती केली होती. सर्वोच्च न्यायालयाने राहाता न्यायालयाचा निर्णय कायम ठेवून विखे कारखाना संचालकांविरोधात गुन्हे दाखल करून तपास करण्याचे आदेश दिले होते. आरोपींमध्ये पद्मश्री डॉ. विठ्ठलराव पाटील सहकारी साखर कारखान्याचे तत्कालीन चेअरमन, संचालक, अधिकारी, शिवाजीनगरमधील युनियन बँक ऑफ इंडियाचे तत्कालीन रिजनल मॅनेजर, शिवाजीनगरमधील बँक ऑफ इंडियाचे तत्कालीन झोनल मॅनेजर तसेच तत्कालीन साखर आयुक्त यांचा समावेश आहे.



**सुप्रिम कोर्टाच्या ऑर्डर विरोधकांनी लपवून ठेवल्या. मुळात रक्कम कारखान्याकडे आलीच नाही. त्या त्या राष्ट्रीयकृत बँकेत जमा झाली आणि त्यांनी ती परत राज्य सरकारकडे जमा केली. सर्व ते मागच्या रिपोर्टमधे आलेले आहे. माध्यम प्रतिनिधींना त्यांनी सुनावले, आम्हाला काय कोणाचा दणका असायचे कारण नाही, आमचे अनेकांना दणके बसले आहेत. त्या वैफल्यापोटी सर्व चालू आहे.**

## समाजाची बचत आणि भांडवलदारांचे व्हाइट ऑफ



तोटा सहन करू शकणारे लाखो कोटी रुपयांचे जोखीम भांडवल असणारे रिलायन्स रिटेलचे कॉर्पोरेट मॉडेल विरुद्ध संसार चालवण्यासाठी जिवंत राहण्यासाठी कोट्यवधी किरकोळ विक्री दुकाने चालवणारे स्त्री पुरुष ! रिटेल क्षेत्रात दुकानाची लोकेशन निर्णय ठरते. बाजाराच्या रस्त्यावर असणाऱ्या दुकानाचा धंदा त्याच हमरस्त्याला लागून असलेल्या गल्लीत त्याच चीजवस्तू विकणाऱ्या दुकानाच्या विक्रीपेक्षा काही पटीने जास्त असतो. नोकऱ्या मिळत नाहीत म्हणून किंवा जोडधंदा म्हणून लाखो लोक आपल्या एरियात, मिळेल त्या ठिकाणी एखादे छोटे दुकान टाकतात. त्यांच्यापैकी अनेकांना काही दुकान बंद देखील करावे लागते, कायमचे. डोक्यावर मोठे कर्ज घेऊन. ते अजून मोक्याच्या ठिकाणी दुसरे दुकान टाकण्याचा विचार देखील करू शकत नाहीत पण ज्याच्याकडे न संपणाऱ्या जोखीम भांडवलाचा स्रोत असेल तो पत्त्याचा कॅट पिसावा तशी आधी उघडलेली दुकाने बंद करून नवीन दुकाने उघडू शकतो. उघडलेल्या दुकानात झालेला कोट्यावधी रुपयांचा तोटा व्हाईट ऑफ करू शकतो. जे मुकेश अंबानी यांची रिलायन्स रिटेल करत आहे. वित्तीय वर्ष २०२४-२५ या बारा महिन्यात रिलायन्स रिटेलने २१५५ स्टोअर्स बंद केली. म्हणजे दिवसाला सहा. श्वास धरून ठेवा आणि याच बारा महिन्यात २६५९ नवीन रिटेल स्टोअर्स उघडली. त्या आधीच्या वर्षात २०२३-२४ मध्ये पुरेसा धंदा होत नाही म्हणून १०४४ स्टोअर्स बंद केली आणि १८४० नवीन उघडली. का बंद केली ? तर त्यांना हवा तेवढा धंदा त्यातून मिळत नव्हता म्हणून. अर्थात नवीन उघडलेली दुकाने बंद केलेल्या दुकानापेक्षा वेगळ्या लोकेशनला उघडली गेली आहेत. किती भांडवल व्हाइट ऑफ केले गेले असेल ? आणि किती नवीन ओतले गेले असेल ? मार्च २०२४ अखेरीस रिलायन्स रिटेलची १९,३४० रिटेल स्टोअर्स देशभरात कार्यरत आहेत. आणि सगळ्या रिटेल स्टोअर्सचा एकूण एरिया आठ कोटी स्क्वेअर फूट आहे. किती ? आठ कोटी स्क्वेअर फूट ! एकूण विक्री ३,००,००० कोटी रुपये आहे. ही झाली रिटेल क्षेत्रातील एक कंपनी. अशा अनेक आहेत ही आहे कॉर्पोरेट भांडवलाची ताकद. त्यांचे खिसे एव्हढे खोल आहेत की ते शेकडो कोटी रुपयांचा तोटा सहन करून त्याचवेळी नवीन भांडवल घालून तो तोटा दामदुपटीने भरून काढू शकतात. आणि हे सामर्थ्य काही अंबानींच्या खिशातून येत नाही. समाजाच्या बचतीतून येते. सुटेड बुटेड मुक्त आर्थिक तत्त्वज्ञान पाजळणारे अर्थतज्ञ आणि त्यांचे निम्न मध्यमवर्ग/ मध्यम वर्गातील अर्धवट प्रवक्ते ''मग तुम्हाला जमत असेल तर तुम्ही करून दाखवा. सर्वांसाठी सर्व काही मुक्त आहे'' असे सांगत फिरतात. हे म्हणजे शेळ्या मेंढ्यांना वाघांच्या समोर स्पर्धा करायला सांगण्यासारखे आहे. भारतातील रिटेल क्षेत्र शेती क्षेत्राखालोखाल लोकांना उपजीविका पुरवत आहे. अनौपचारिक क्षेत्रातील छोट्या, मध्यम दुकानांचे रक्तहीन सांगाडे अनेक वर्ष जिवंत राहतील देखील. पण त्यात जान नसेल. इथे रिलायन्स रिटेल हे एक उदाहरण घेतले आहे. नेहमीप्रमाणे अंबानींच्या नावाने शंख करू नका. नावे कमी घ्या सिस्टीम समजून घ्या. कारण रिटेल क्षेत्रात मॉल, रिटेल चेन्स, ई-कॉमर्स, क्विक कॉमर्स, परकीय रिटेल ब्रँड याच्या साहाय्याने कोर्पोरेटीकरण सुरु आहे. त्याला वॉलस्ट्रीट पासून दलाल स्ट्रीटवरील वित्त भांडवल येत आहे / येणार आहे.



**संजीव चांदोरकर**
अर्थविषयक अभ्यासक
**अर्थवार्ता**

जातीनिहाय जनगणना निर्णयाचे

## कम्युनिस्ट पक्षाच्या वतीने स्वागत - ॲड. कॉ. सुभाष लांडे





**मुंबई । प्रतिनिधी**

जातीनिहाय जनगणना करण्याच्या निर्णयाचे भारतीय कम्युनिस्ट पक्षाच्या वतीने स्वागत करण्यात येत आहे, अशी माहिती भाकपचे राज्य सचिव ॲड. कॉ. सुभाष लांडे यांनी दिली.

ते म्हणाले, भारतीय कम्युनिस्ट पक्षाने जातिनिहाय जनगणनेच्या मागणीसाठी देशव्यापी आंदोलन केले होते, ती मागणी मान्य करून जातिनिहाय जनगणना करण्याची घोषणा केंद्रीय मंत्रीमंडळाच्या बैठकीत करण्यात आली आहे.



## स्तंभलेखिका सुवर्णा गावकर यांना राष्ट्रीय गौरव पुरस्कार प्रदान

**मुंबई । गुरूदत्त वाकदेकर**

दै.रयत समाचारसह अनेक वृत्तपत्रांमधे सामाजिक विषयांवर लिहिणाऱ्या गोवास्थित स्तंभलेखिका तथा सामाजिक कार्यकर्त्या सुवर्णा एस. गावकर यांना दि सोसायटी ऑफ जिप्सी संस्थेचा मानाचा २०२५ चा राष्ट्रीय गौरव पुरस्कार ता.२९ एप्रिल रोजी प्रदान करण्यात आला. मुंबईतील माटुंगा येथे पेन्सवल्डचे संचालक जो पेन यांच्या हस्ते गावकर यांना सन्मानित करण्यात आले. यावेळी ज्येष्ठ सिनेनाट्य अभिनेते विजय गोखले, नटसम्राटचे भालचंद्र उसगावकर उपस्थित होते.

दि सोसायटी ऑफ जिप्सी ही संस्था मिनिस्ट्री ऑफ एमएसएमई आणि भारत सरकारच्या निती आयोगाची मान्यताप्राप्त आहे. सोशल हेल्पिंग फौंडेशनचे संस्थापक राजेश के. आणि दि सोसायटी ऑफ जिप्सीचे संस्थापक अनंत अंकुश यांनी विशेष सन्मान करत पुरस्कार प्रदान केला. यावेळी अनेक मान्यवर उपस्थित होते. पुरस्काराबद्दल सुवर्णा गावकर यांचे प्रभाकर ढगे, श्याम नागवेकर, पुरूषोत्तम पै, दिनेश पै आंगले, हेमचंद्र तारी व डॉ. ऋषिकेश वालझाडे यांनी अभिनंदन केले. गोवकर यांचे सर्वत्र अभिनंदन कौतुक होत आहे.

## महात्मा बसवेश्वर हे जगातील लोकशाहीचे पहिले उद्गाते- डॉ. सबनीस



**पिंपरी । प्रदीप गांधलीकर**

महात्मा बसवेश्वर हे केवळ भारतातीलच नव्हे तर जगातील लोकशाहीचे पहिले उद्गाते होते, असे विचार ज्येष्ठ साहित्यिक आणि विचारवंत डॉ. श्रीपाल सबनीस यांनी महात्मा बसवेश्वर पुतळा उद्यान, भक्ती - शक्ती चौक, निगडी येथे व्यक्त केले. वीरशैव लिंगायत समाज आणि पिंपरी - चिंचवड महापालिका यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित जगद्ज्योती महात्मा बसवेश्वर जयंती उत्सवात डॉ. श्रीपाल सबनीस बोलत होते.

ज्येष्ठ साहित्यिक प्रा. तुकाराम पाटील अध्यक्षस्थानी होते; तसेच नवयुग साहित्य व शैक्षणिक मंडळाचे अध्यक्ष राज अहेरराव, पिंपरी - चिंचवड साहित्य मंचाचे अध्यक्ष राजेंद्र घावटे, सुप्रसिद्ध कवी अनिल दीक्षित, बसवेश्वर पुतळा समिती अध्यक्ष नारायण बहिरवाडे, महापालिका जनसंपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक यांची व्यासपीठावर प्रमुख उपस्थिती होती. डॉ. सबनीस पुढे म्हणाले, बाराव्या शतकात बसवेश्वर यांनी लोकशाहीची मुळे रुजवली. कार्ल मार्क्स, महात्मा गांधी, संत गाडगेबाबा अशा असंख्य प्रभृतींच्या विचारांचे पूर्वज म्हणजे महात्मा बसवेश्वर होत. त्यामुळेच महात्मा गांधी, मानवेंद्र नाथ रॉय, राष्ट्रपती डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम अशा अनेक दिग्गजांनी बसवेश्वर यांच्याविषयी एकमुखाने गौरवोद्गार काढले आहेत.

इंग्लंडमध्ये थेम्स नदीच्या काठावर बसवेश्वर यांचा पुतळा उभारण्यात आला आहे. त्यामुळे महात्मा बसवेश्वर यांना लिंगायत समाजापुरते मर्यादित ठेवता येणार नाही; तर वैश्विक महापुरुष म्हणूनच त्यांच्याकडे पाहवे लागेल; तसेच त्यांच्या लोकशाही तत्त्वांवरील वचनांनुसार साहित्य, संगीत, कला यांनाही वैश्विक परिमाण लाभेल! व्याख्यानापूर्वी, पिंपरी - चिंचवड साहित्य मंच आयोजित शब्दवैभव काव्यसंमेलन संपन्न झाले. ज्येष्ठ कवी प्रा. तुकाराम पाटील कविसंमेलनाच्या अध्यक्षस्थानी होते. यामध्ये राज अहेरराव, राजेंद्र घावटे, अनिल दीक्षित, शोभा जोशी, चंद्रकांत धस, मीना शिंदे, रमेश उमरगे, रेवती साळुंखे, पीतांबर लोहार, बाबू डिसोजा, रेणुका हजारे, सुनंदा शिंगनाथ, हेमंत जोशी, नीलेश शेंबेकर, सविता इंगळे, कैलास भैरट, पौर्णिमा कोल्हे, अरुण कांबळे, ज्योती देशमुख, दत्तू ठोकळे, वंदना इन्नाणी या निमंत्रित कवींनी सहभाग घेतला. गझल, लावणी, सवालजबाब, दोहे, मुक्तच्छंद अशा वैविध्यपूर्ण काव्यप्रकारांच्या आशयगर्भ कवितांना श्रोत्यांनी उत्स्फूर्त दाद दिल्याने कविसंमेलन उत्तरोत्तर रंगत गेले. सीमा गांधी यांनी सूत्रसंचालन केले.

कविसंमेलनानंतर लिंगायत सखी मंचच्या महिलांनी नाटिका, नृत्य यांचे सादरीकरण केले. दत्तात्रय बहिरवाडे, अण्णाराय बिरादार, चंद्रशेखर दलाल, गुरुराज चरंतीमठ, बसवराज साखरे आणि वीरशैव लिंगायत समाज कार्यकर्ते यांनी संयोजनात परिश्रम घेतले. राजाराम सावंत यांनी आभार मानले.

# स्वत:मधल्या विश्वासाला जिवंत ठेवले तर यश हमखास मिळते- डॉ.क्षितिज घुले

## युपीएससी उत्तीर्ण ओंकार खुंटाळे यांचा गौरव

**अहमदनगर । प्रतिनिधी**

येथील जनता शिक्षण प्रसारक मंडळाचे, मारुतराव घुले कला,वाणिज्य व शास्त्र महाविद्यालय, बोल्हेगाव येथील माजी विद्यार्थी ओंकार राजेंद्र खुंटाळे यांची संघ लोकसेवा आयोग नागरी सेवा परीक्षा २०२४ मध्ये ६७३ व्या क्रमांकाने उत्तीर्ण झाल्याबद्दल जनता शिक्षण प्रसारक मंडळ दहिगाव-ने,संस्था विश्वस्त, मा.सभापती डॉ.क्षितिज घुले यांच्या शुभहस्ते ओंकार खुंटाळे याचा सत्कार करण्यात आला. यावेळी बोलताना डॉ.क्षितिज घुले म्हणाले की, अभ्यासाबरोबर आत्मविश्वासाची जोड असेल तर अशक्य असणारे ध्येय,यश सहजरीत्या मिळवता येते. स्वतः मधल्या विश्वासाला जर जिवंत ठेवता आले तर कुठलेच अपयश आपल्याला यशापासून रोखू शकत नाही. प्रयत्न करत असताना हार मिळाली म्हणून न थांबता त्यात सातत्य ठेवले तर यश हे नक्कीच मिळते असे ओंकारच्या बाबतीत घडले आहे. याचा महाविद्यालयीन



विद्यार्थ्यांनी आदर्श घेतला पाहिजे असे गौरव उद्गार त्यांनी सत्कार प्रसंगी काढले. सत्कारमूर्ती ओंकार खुंटाळे यावेळी आपले अनुभव व्यक्त करताना म्हणाले की, अपयशाने खचून न जाता प्रयत्नांचे सातत्य हेच यशाचे रहस्य आहे.या कॉलेजने राष्ट्रीय सेवा योजना सहभाग तसेच वकृत्व स्पर्धे साठी दिलेली संधी तसेच विविध सांस्कृतिक व शिवजयंती उत्सव निमित्त सूत्रसंचालना मध्ये कॉलेजने मला दिलेली लीडरशिप तसेच कॉलेजमधून स्वतःचा सामाजिक जाणवेचा आलेख उंचावत गेलेला दिसून आला असे मत यावेळी व्यक्त केले. कॉलेजचे प्राचार्य डॉ.ए.के.पंदरकर यांनी अध्यक्षीय मनोगत व्यक्त करताना म्हणाले की, विद्यार्थी आणि प्राध्यापकां दरम्यानचा संबंध हा शैक्षणिक यशाची गुरुकिल्ली आहे. प्राध्यापक विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतात,त्यांना प्रेरणा देतात आणि त्यांच्यात आत्मविश्वास वाढवतात, तर विद्यार्थी प्राध्यापकांच्या मार्गदर्शनाचे पालन करतात, अभ्यास करतात आणि ज्ञान मिळवतात.या सहकार्यामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक यश वाढते आणि त्यांचे भविष्य उज्ज्वल होते. प्राध्यापकांच्या प्रामाणिक मार्गदर्शनामुळे विद्यार्थी घडत असतात यापुढेही ओंकार खुटाळे सारखे विद्यार्थी या महाविद्यालयातून घडले पाहिजे असे मत यावेळी व्यक्त केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.डॉ. के आर पिसाळ यांनी केले तर आभार प्रा. एस व्ही मरकड यांनी मानले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ.एस बी दहातोंडे यांनी केले. याकार्यक्रमप्रसंगी उपप्राचार्य प्रा. पी ए फटांगरे, संगणक विभाग प्रमुख प्रा.डॉ. एम ए शेख,कार्यालय अधीक्षक पी.व्ही. दळवी, ऋतिक ताकपेरे, अल्तमश शेख, श्यामा वाळके तसेच प्राध्यापक व प्रशासकीय सेवक यांनी ओंकार खुंटाळे यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

## हरदिन मॉर्निंग ग्रुपच्या पाठपुराव्याला यश

**भिंगार । प्रतिनिधी**

भिंगार छावणी परिषदेच्या भगवान गौतम बुद्ध जॉगिंग पार्कमध्ये योग व प्राणायामासाठी उभारल्या जाणाऱ्या स्टेज व शेडच्या कामाचे भूमिपूजन अक्षय तृतीयेच्या मुहूर्तावर करण्यात आले. आमदार संग्राम जगताप यांच्या स्थानिक विकास निधीतून १२ लाख ६० हजार रुपयांच्या खर्चातून होणाऱ्या या कामाच्या भूमिपूजनाचे आयोजन करण्यात आले होते. छावणी परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विक्रांत मोरे व हरदिन मॉर्निंग ग्रुपचे संस्थापक अध्यक्ष संजय सपकाळ यांच्या हस्ते भूमिपूजन करण्यात आले.



शिवछत्रपती पुरस्कार विजेत्या कोमल नारायण वाकळे यांच्याकडून महाराष्ट्र दिन व जागतिक कामगार दिनाच्या हार्दिक शुभेच्छा



जिजाऊ रथयात्रेचे डांगे चौक थेरगाव येथे स्वागत करताना जिजाऊ ब्रिगेडच्या महिला तर चिंचवड स्टेशन येथे जिजाऊ रथयात्रेचे स्वागत करताना सतीश काळे, मारूती भापकर, वसंत पाटील आदींसह शिवभक्त.

# अरणगाव, मेहेराबाद येथील हराळमळ्यात बिबट्या जेरबंद

**अहमदनगर । प्रतिनिधी**

साधारण गेले दीड वर्षपासून पासुन अरणगाव, मेहेराबाद येथिल हराळमळा व लगत सोनेवाडी परीसरात मुक्त संचार करीत असलेला नर बिबट्या अखेरीस काल दि.२९ एप्रिल रोजी पिंजऱ्यात कैद झाला.सदर पिंजरा २८ एप्रिल रोजी हराळ मळा येथे वनविभागाकडून लावण्यात आला होता. आज पिजऱ्यात बिबट्या जेरबंद झाल्याचे वृत्त कळताच वनविभागाचे स्टाफ श्री चेमटे,अशोक गाडेकर,वनपाल गायकवाड,प्राणीमित्र हर्षद कटारीया ,संदिप ठोमरे ,रनसिंग मेजर,सभोवतालचे शेतकरी,सोनेवाडीचे गोरक्ष जगन्नाथ दळवी,हराळ मळ्यातील सुट्टिवर आलेले बीएसएफचे प्रसाद हराळ,ग्रामस्थ,तरूण युवक घटनास्थळी हजर झाले व त्या सर्वांचे सहकार्याने सकाळी ८ वा.बिबट्या बंदिस्त पिंजरा वनविभागा मार्फत नेण्यात आला व सभोवतालच्या नागरीकांनी सुटकेचा निः श्वास टाकला.



**बीएसएफचे जवान प्रसाद हराळ यांचे ४ दिवसात मोठे सहकार्य झाले दोन दिवसापूर्वी रात्री त्यांना बिबट्या दिसला व त्यांना माहिती असल्याने बिबट्याचे पायाचे ठसे घेण्यापासून ते वन विभागाला माहिती देऊन जवळच लावलेला सोनेवाडी येथील पिंजरा हराळ मळा येथे आणण्यास व लावण्यास सहकार्य केले व त्यावर निगराणी केली,व बिबट्या जेरबंद झाल्याने ग्रामस्थांनी सुट्टीवर आलेले बीएसएफचे प्रसाद हराळ यांचे ट्रैप लावण्यासाठी अनमोल सहकार्य झाल्याबद्दल त्यांचे कौतुक केले.**

अरणगाव मेहेरबाद येथिल हराळ मळ्यात दीड वर्षांपूर्वी अक्षय हराळ यांचे पाळीव कुत्र्यावर जंगली हिंस्र प्राण्याने हमला करून ठार मारल्याचे निदर्शनास आले होते, तेव्हापासून अधून मधून अरणगाव मेहेराबाद हराळमळा व लगत सोनेवाडी परीसरात बिबट्याचा मुक्त संचार होता,इन्स्पेक्टर सीआरपीएफ सचिन हराळ यांचे उसाच्या शेतात ऊस तोड चालु असताना ४ दिवसापूर्वी वासराचा मृतदेह व बिबट्याचे पावलाचे ठसे दिसले.घटना समजताच वनविभागाचे अधिकारी श्री गाडेकर वबाळासाहेब रनसिंग हे घटना स्थळी दाखल झाले त्यांनी परीसराची पहाणी करून परीसरात पिंजरा लावला व तो जेरबंद झाला

# अस्थिरोग संघटना १ मे रोजी करणार एमओए डे साजरा

## तंदुरुस्तीमधून आरोग्य प्राप्तीसाठी विविध उपक्रम व शिबिराचे आयोजन

**अहमदनगर । प्रतिनिधी**

महाराष्ट्र अस्थिरोग संघटना आणि अहिल्यानगर अस्थिरोग संघटनेच्या संयुक्त विद्यमाने गुरुवारी, १ मे रोजी एमओए डे उत्साहात साजरा करण्यात येणार आहे. यावर्षीची थीम फिटनेस म्हणजेच तंदुरुस्ती अशी असून ब्रीदवाक्य वेलनेस थ्रो फिटनेस (तंदुरुस्तीमधून आरोग्य प्राप्ती) ठेवण्यात आले आहे.

महाराष्ट्र अस्थिरोग संघटनेचे अध्यक्ष डॉ. संपत डोंगरे व डॉ. संपत डुंबरे यांच्या मार्गदर्शनाखाली संपूर्ण महाराष्ट्र एमओए डे साजरा होत आहे. या अनुषंगाने अहिल्यानगर अस्थिरोग संघटनेच्या माध्यमातून विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. हाडांचे आरोग्य, संधिवात, हाडांचा ठिसूळपणा यासारख्या आजारांविषयी जनजागृती आणि मोफत आरोग्य तपासणी शिबिरे घेऊन नागरिकांमध्ये आरोग्यविषयी जागरूकता निर्माण केली जाणार आहे. १ मे रोजी शहरातील जवळजवळ सर्व अस्थिरोग तज्ज्ञांच्या हॉस्पिटल्समध्ये सवलतीच्या दरात तपासणी व उपचार उपलब्ध करून दिले जाणार आहेत.

त्याचप्रमाणे, १ मे ते ४ मे या कालावधीत मोफत आरोग्य तपासणी, हाडांचा ठिसूळपणा तपासणी, संधिवात तपासणी आणि फिजिओथेरपी शिबिरे आयोजित करण्यात येणार आहेत. सरकारी कार्यालये आणि बँक कर्मचाऱ्यांसाठी खास शिबिरे घेण्यात येणार असून त्यांना कामाचे स्वरूप आणि तणावामुळे होणाऱ्या अस्थिसंस्थेच्या तक्रारींबाबत मार्गदर्शन केले जाणार आहे.

भरतीपूर्व प्रशिक्षण घेणाऱ्या तरुणांना लिगामेंट इंजुरी, स्नायूंच्या दुखापती, आणि फिटनेससंदर्भात तज्ज्ञांकडून सल्ला व उपचार मिळणार आहेत. त्यामुळे युवा वर्गासाठीही एमओए डे हा उपयुक्त ठरणार आहे. शहरात अशा प्रकारचे विविध उपक्रम अस्थिरोग संघटनेत मार्फत केले जाणार असल्याची माहिती महाराष्ट्र अस्थिरोग संघटनेचे एक्झिक्युटिव्ह कमिटी सदस्य व मो डे चे महाराष्ट्र राज्याचे समन्वयक डॉ. राहुल पंडित यांनी दिली आहे. १ मे रोजी सकाळी ७:३० ते १०:०० या वेळेत साईनगर व विनायक नगर परिसरातील ज्येष्ठ नागरिक भवन येथे मोफत आरोग्य तपासणी शिबिर आयोजित करण्यात आले आहे. या शिबिरात डॉ. राहुल पंडित, डॉ. महेश वीर व डॉ. अखिल धानोरकर हे रुग्णांची तपासणी करतील. या कार्यक्रमासाठी माजी उपमहापौर गणेश भोसले प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत.

यामध्ये डॉ. राहुल पंडित, डॉ. महेश वीर व डॉ. अखिल धानोरकर हे रुग्णांना तपासणार आहे. सर्वांनी विविध शिबिरांचा लाभ घेण्याचे आवाहन अहिल्यानगर अस्थिरोग संघटनेच्या वतीने करण्यात आले आहे.



श्री विशाल गणेश मंदिरात अक्षय तृतीयानिमित्त श्री विशाल गणेशाला ५५५१ आंब्यांचा नैवेद्य दाखवून आंब्यांची सजावट करण्यात आली. श्री विशाल गणेशाचे मनोहारी रूप पाहण्यासाठी भाविकांची मोठी गर्दी झाली, अशी माहिती ऋषीकेश आगरकर यांनी दिली.

रयत समाचार Classified छोटी जाहिरात

छोटी जाहिरात, उत्तम प्रतिसाद

खरेदी विक्री । नोकरी विषयक । नावात बदल
आरोग्य विषयक । वाढदिवस । विवाह विषयक

**भाड्याने देणे**
परिचय हॉटेलजवळ, बालिकाश्रम रोडवर कॉर्पोरेट ऑफिस, बँक, शोरूम, क्लिनिक आदींसाठी ८०० स्क्वेअर फुटाचे दोन मजले बांधलेली जागा भाड्याने देणे आहे.
- संपर्क -
८८८८३४७४११

निसार Art
सर्व प्रकारच्या व्यावसायिक क्षेत्रातील वॉल पेन्टीग जाहिरात (भिंत पेंटिंग) साठी राज्यातील नावाजलेले निसार आर्ट
7020356335 | 9860830016
पत्ता : प्लॉट नं.३, नवीन महानगरपालिकेसमोर, औरंगाबाद रोड, अ.नगर.



मे. रुपाली एजन्सी
फुड प्रॉडक्ट मटेरियल सप्लायर्स
राधिका लॉजजवळ, तापकीर लेन, आडत बाजार, अहमदनगर - ४१४००१.
(०२४१) २३४३०६०, ९८२२८४३०६०
ई-मेल - rupaliagency@gmail.com

रावसाहेबचा चहा, एकदा पिऊन पहा!
कोतवाली पोलीसस्टेशन शेजारील सुप्रसिध्द
जगदंबा टी सेंटर
चहा, कॉफी, लेमन टी
शाखा नं.१- माणिक चौक, अ.नगर
शाखा नं.२- वसंत टॉकीजजवळ, भोला पान सेन्टर शेजारी, अ.नगर
प्रो.प्रा. रावसाहेब ठोंबे
97655 58585

सर्व प्रकारच्या छोट्या जाहीरातींसाठी ८८०५४०१८०० | ७७७४००१८०० | ९८२२४९६६६४ या क्रमांकावर संपर्क करा

हे दैनिक प्रकाशक, मालक, संपादक, भैरवनाथ तुकाराम वाकळे, 8805401800 यांनी मुद्रक आबीदखान दुलेखान यांच्या मखदुम प्रिंटर्स,३५८८, माणिक चौक, अहमदनगर येथे छापून तेथेच प्रसिध्द केले. कार्यालयाचा पत्ता : ५, गजानन अपार्टमेंट, झोपडी कॅन्टीन, मनमाडरोड, सावेडी, अहमदनगर-०३.कार्यालय, 8805401800 **Email : rayatsamachar007@gmail.com , उपसंपादक : दिपक शिरसाठ,** 7774001800, **समूह संपादक : प्रभाकर ढगे, पणजी, गोवा,** 9373021584, **गोवा कार्यालय : १३१, गोमंतक प्रेस जवळ, सांतिनेज, पणजी - गोवा, कर्नाटक कार्यालय : श्रीकांत काकतीकर, निवासी संपादक,१९१, बॅ.नाथ पै चौक, पोस्ट ऑफीसच्या मागे, शहापूर, बेळगाव कर्नाटक,** 9036799516,shrikantkaktikar@gmail.com **(वाद-विवाद अहमदनगर न्यायालयीन न्यायकक्षेत)**

# डालमिया विरोधात शेतकरी आक्रमक

## सिमेंट कंपनी विरोधात नोंदविल्या हरकती

**श्रीगोंदा । माधव बनसुडे**

भिमानदीच्या काठी बागायत भागातील शेतकऱ्यांना उध्वस्त करुन सुमारे ४९ गावांना बाधीत असणाऱ्या डालमिया भारत ग्रीन व्हिजन लिमिटेड ह्या सिमेंट कंपनी विरोधात आज वरिष्ठ अधिकार्यासमोर हरकती नोंदविताना शेतकऱ्यांनी अधिकार्याना घाम फोडल्याने शेतकऱ्यांच्या एकाही प्रश्नाची उत्तर अधिकार्याना देताना न आल्याने कंपनीचे अधिकारी व प्रशासकिय अधिकार्यानी नरमाईची भूमिका घेतली. श्रीगोंदा तालुक्यातील निमगावखलू येथे डालमिया यांची सिमेंट कंपनी होत असताना येथील शेतकऱ्यांना कंपनीला विरोध केल्याने आज ता. २९ रोजी सांगवी फाटा येथे शांताई मंगल कार्यालयात अप्पर जिल्हा अधिकारी अरुण हुके, यांच्या अध्यक्षतेखाली व नाशिक विभागीय अधिकारी लिंबाजी भड व महाराष्ट्र प्रदुषण मंडळाचे उपविभागीय अधिकारी चंद्रकांत शिंदे यांच्या प्रमुख उपस्थितीत कंपनीचे अधिकारी व शेतकरी यांच्या हरकती नोंदविण्यासाठी जनहित सुनावनी ठेवली होती. यामध्ये जर सिमेंट कंपनी या परिसरात झाली तर तिच्या वायु व ध्वनी प्रदुषणाचा परिसरातील सुमारे ४९ गावातील शेतकऱ्यांना त्यांच्या शेतीपिकावर मोठा परिणाम होऊन येथील शेतकरी संपूर्ण उध्वस्त होईल.

हरकती नोंदविताना शेतकरी म्हणाले कि आक्टोंबर २०२४ मध्ये कंपनीने एजन्ट व दलालामार्फत बोगस माहिती जमा करुन प्रोजेक्ट तयार केला. यावेळी स्थानिक गावातील विश्वासात घेतले नाही. संबंधित कंपनी बेकायदेशीर आहे. असे प्रकल्प हे इंडस्ट्रीज झोन मध्ये पाहिजे. बागायत भागात कंपनी उभी करुन शेतकऱ्यांवर अन्याय आहे. असे प्रकल्प हे जीरात भागात उभे करुण येथे पर्यावरण पुरक प्रकल्प असावा असे प्रकल्प झाले तर याचे केमिकल शेजारी



भिमानदीच्या पात्रात जावून हिच नदी पुढे पंढरपूर मध्ये चंद्रभागा नदीमध्ये जावून भविष्यात वारकरी भाविकांना त्रास होणार आहे. तसेच हेच नदीचे केमिकलयुक्त पाणी शेतीला जाते यातून विहिरी व बोरवेल मध्ये जावून शेतकऱ्यांचे आरोग्य धोक्यात येईल.याच परिसरात १ हजार २०० एकर जागेत महाराष्ट्रात सर्वात मोठे एस.आर.पी.चे ठिकाणी आहे. व १ हजार २०० एकर जागेत वनविभागाचे जंगल आहे तेथील पशुपक्षी नष्ट होतील.

कंपनी पाच लाख टन कोळसा वापरणार त्यातून सल्फर हा विषारी वायू तयार होवून सर्वाना घातक होणार.कंपनीचा माला दररोज वाहतूक होताना वाहणातील धूळीचा रस्त्यावरील गावांना दररोज त्रास होणार आहे. असे असताना कंपनीचा शेतकऱ्यांच्या विरोधात जावून प्रकल्प उभा करण्याचा अट्टहास का करित आहे. दिल्लीच्या कंपनीने जिरायत जमीन म्हणून अहवाल दिला.

त्यामुळे कंपनीने जो प्रोजेक्ट रिपोर्ट तयार केला तो संपूर्ण चूकिचा दाखवून शेतकऱ्यांची दिशाभूल केली आहे. आणि शेवटी कंपनीने महत्वाचा गाभा म्हणजे प्रदुषण कसे तयार होते हे शेतकऱ्यां पासून लपून ठेवले.यासह अनेक प्रश्नाची शेतकऱ्यांनी सरबती करुण प्रशासकिय अधिकारी व कंपनीचे अधिकारी यांची बोलती बंद केली.यावर एकाही अधिकार्याना शेतकऱ्यांच्या प्रश्नाचे उत्तर सविस्तर देता आले नाही. यावेळी बचाव कृती समितीचे अध्यक्ष शाहुराजे शिपलकर, माजी आमदार राहुल जगताप, केशव मगर,जीवन शिपलकर,विठ्ठलराव काकडे,राकेश पाचपुते, आबासाहेब कोल्हटकर, जितेंद्र मगर, युवराज चितळकर, योगेश भोयटे, नितीन थोरात,अनिल मगर,सतिष शिपलकर, राजेंद्र सोनवणे, चांगदेव पाचपुते, बापु भुजबळ,अशोक मचाले, शरद चांदगुडे, शांतीलाल खरात, ओंकार शिपलकर, कौशीक मगर,सागर मंत्री यांच्यासह शेतकऱ्यांनी आक्रमक भूमिका घेऊन कंपनीच्या विरोधात हरकती नोंदवून मोठमोठ्या घोषणा देत निषेध नोंदविला यावेळी मोठ्या संख्येने महिला पुरुष शेतकरी तरुण वर्ग हजर होता. कंपनीने शेतकऱ्यांसाठी नाश्ता जेवन ठेवले होते. परंतु येथे कोणीही जेवले नाही. उलट शेतकऱ्यांनी घरुण आणलेली चटनीभाकर तसेच बाहेरुण वडापाव,भेळ बिस्किटे आनून खाल्ली पण कंपनीच्या अन्नाला हात लावला नाही. शेवटी कृती समितीचे सचिव प्रा. सुनील माने यांनी आभार मानले.

# तनपुरे कारखाना निवडणूक छाननीत ७ उमेदवारी अर्ज बाद

**राहुरी । शफीक बागवान**

राहुरीच्या डॉ.तनपुरे साखर कारखान्याच्या निवडणुकीसाठी दाखल झालेल्या १८० अर्जाची मंगळवारी छाननी करण्यात आली. यामध्ये ७ अर्ज बाद करण्यात आले. त्यामुळे आता १७३ उमेदवारांचे अर्ज वैध झाले आहेत.

डॉ. बाबुराव बापूजी तनपुरे सहकारी साखर कारखान्याच्या संचालक मंडळाच्या २१ जागांसाठी येत्या ३१ मे २०२५ रोजी मतदान होणार आहे. दुसऱ्या दिवशी १ जून रोजी मतमोजणी प्रक्रिया होऊन निकाल जाहीर केला जाणार आहे. काल १८० अर्जाची छाननी करण्यात आली. यात सर्वसाधारण



मतदारसंघात एकाच गटात दोन नामनिर्देशन पत्र दाखल केलेल्या उमेदवाराचे एक नामनिर्देशन पत्र वैध करण्यात आले. दुसरे अतिरिक्त नामनिर्देशनपत्र बाद करण्यात आले.

त्यामध्ये विलास भागवत गागरे (कोल्हार गट), युवराज सुधाकर तनपुरे (वांबोरी गट), अरुण बाबुराव तनपुरे (राहुरी गट) या तीन जणांचे अतिरिक्त अर्ज बाद करण्यात आले. तसेच महिला प्रतिनिधी मतदारसंघात प्रमिला अनिल शिरसाठ यांनी दोन अर्ज दाखल केले होते. त्यांचेही एक बाद करून एक नामनिर्दे शन पत्र वैध करण्यात आले. सर्वसाधारण मतदारसंघात ज्या गटात नामनिर्देशन पत्र दाखल केले, त्याच गटातील सूचक व अनुमोदक असावेत, असा नियम होता. परंतु राजू सयाराम पोटे (टाकळीमिया गट) व विश्वनाथ भानुदास दुशिंग (वांबोरी गट) यांनी दुसऱ्या गटातील सूचक व अनुमोदक घेतल्याने त्यांचे नामनिर्दे शन पत्र बाद करण्यात आले.

भटक्या विमुक्त जाती जमाती व विशेष मागासवर्ग मतदारसंघातील उमेदवार दिलीप लालगिर गोसावी यांनी नामनिर्देशन पत्रासोबत जातीचा दाखला जोडला नव्हता. त्यामुळे त्यांचे नाम निर्देशन पत्र बाद करण्यात आले आहेत.



# विनाअनुदानित शिक्षकांच्या वेदना मांडत समाज मन सुन्न करणारी लालाय्लू कांदबरी- डॉ.तांबे

## प्रा. भालेराव लिखित लालाय्लू कांदबरीचे दिमाखात प्रकाशन

**संगमनेर । नितीनचंद्र भालेराव**

विनाअनुदानित शिक्षकांच्या व्यथा, वेदना समाजाच्या मनपटलावर मांडत समाज, वाचक मन सुन्न करणारी कादंबरी म्हणजे लालाय्यू असे प्रतिपादन पदवीधर मतदारसंघांचे माजी आमदार डॉ.सुधीर तांबे यांनी नुकतेच संगमनेर येथे केले. संगमनेर येथील भाऊसाहेब गुंजाळ पाटील सह्याद्री ज्युनिअर कॉलेजच्या के.बी. दादा देशमुख सभागृहात नुकताच लालाय्लू या बृहद कादंबरीचा प्रकाशन सोहळा मोठ्या दिमाखात पार पडला यावेळी ते बोलत होते. पुढे बोलताना डॉ.सुधीर तांबे म्हणाले की प्रा. संतोष भालेराव लिखित लालाय्लू या बृहद कादंबरीतून विनाअनुदानित शिक्षकांच्या व्यथा, शिक्षकांच्या समस्या वेदना, स्वप्ने, इच्छा-आकांक्षा समाजाच्या मन पटलावर मांडणाऱ्या आहे. या कादंबरीतुन शिक्षकांच्या प्रश्नांकडे गांभीर्याने लक्ष वेधले आहे.

लालाय्लु शिक्षण व्यवस्थेतील शेंडी लावणारी प्रवृत्ती वाढत आहे. त्याचे दर्शन या कादंबरीतून प्रा. संतोष भालेराव यांनी घडवून आणले आहे.शिक्षण व्यवस्थेतील दाहकता या कादंबरीतून दिसून येते,लालाय्लु हि कादंबरी सर्वोत्तम आहे. सामाजिक वास्तव,लेखकाचे अनुभव विनाअनुदानित शिक्षकांच्या संवेदना यातून सहाशे पानाच्या मोठ्या कादंबरीचे लिखाण प्रकाशित झाले आहे.तसेच शासनाने भरमसाठ महाविद्यालयांना परवानगी दिली आहे, मात्र सर्वच महाविद्यालयांना अनुदान देण्यात येत नाही त्यांना अनुदान कसे? देणार हे सरकार निश्चित सांगू शकत नाही. शिक्षण खात्यातील भ्रष्टाचार वाढत आहे. शिक्षकांकडून संस्थाचालकांच्या अवास्तव अपेक्षा,आर्थिक देवाणघेवाण,शिक्षकाची होणारी पिळवणूक याचा स्पर्श या कादंबरीतून होत आहे असे यावेळी ते म्हणाले. त्याप्रसंगी डॉ.सुधीर तांबे यांच्या हस्ते कांदबरीचे प्रकाशन करण्यात आले.

यावेळी संगमनेर नगरपरिषद नगराध्यक्षा दुर्गा तांबे,ज्येष्ठ लेखक प्रा.मा.रा.लामखडे,मा. प्रधान जिल्हान्यायाधीश तथा संस्थेचे सचिव सुमंत कोल्हे,सहसचिव तथा आचार्य बाबुराव गवांदे,ज्येष्ठ लेखक प्रा.विठ्ठल म.शेवाळे,संगमनेर महाविद्यालय इंगजी विभाग प्रमुख प्रा.डॉ रोहित कावळे,पुरोगामी लेखक प्रा.डॉ.राहुल हांडे,प्रा. नवनाथ डोंगरे,संस्थेचे विश्वस्त मधुकर सोनवणे यांच्या सह इतर मान्यवरांच्या उपस्थितीत हा प्रकाशन सोहळा पार पडला. लालाय्लु कादंबरी प्रकाशन सोहळ्याचे आयोजन भाऊसाहेब संतुजी थोरात महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा.डॉ.बी.डी. वाघ,उपप्राचार्य प्रा.डॉ.व्ही. एस.कोल्हे, सह्याद्री ज्युनिअर कॉलेजचे प्राचार्य प्रा.के. जी.खेमनर,सह्याद्री ज्युनिअर कॉलेज उपप्राचार्य प्रा.एस. पी.सुरसे,शिक्षक प्रतिनिधी प्रा.जी.एल.गुंजाळ,शिक्षिका प्रतिनिधीप्रा. क्यु. एच.सय्यद, शिक्षकेत्तर प्रतिनिधी एस.डी.आव्हाड यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.जी.एल.गुंजाळ यांनी केले. तर प्रास्ताविक प्रा.नवनाथ गुंड यांनी केले.कार्यक्रमाचे आभार प्रा.एस.पी.सुरसे यांनी मानले. सदरचा कादंबरी प्रकाशन सोहळा यशस्वी करण्यासाठी प्रा. रोझा देशमुख,प्रा.ज्योती रायते, प्रा.सुरेश घोरपडे, प्रा.नितीन नवले, प्रा.मनोज जगताप, प्रा.प्रवीण वर्पे,प्रा. दादा पाटील दिघे,प्रा.उत्तम खेमनर, प्रा.बाबासाहेब दिघे, प्रा.संकेत मोरे, प्रा.ज्ञानेश्वर कोहकडे, प्रा.दिगंबर मुळे, प्रा.समीर लामखेडे, प्रा.प्रकाश कोल्हे, प्रा.बाबासाहेब नवले, प्रा.बाळासाहेबगुंजाळ,प्रा.अबू इनामदार, प्रा.राजू जगताप, प्रा.संजय लबडे, प्रा.माधुरी भुसाळ, प्रा.सुलोचना कुटे, प्रा.तारामती सातपुते, आर.बी. राहाणे, शांताराम कढणे, विजु राहाणे,अशोक भालेराव, भाऊसाहेब भालेराव,कैलास भालेराव, प्रा.रामदास वाघ प्रा.अनिल गवारे, प्रा.जयश्री कडलग, प्रा.रुपाली सुपेकर, प्रा.निलेश सूर्यवंशी,सीमा देशमुख,प्रतिभा कवडे,जयश्री महानोर, प्रा.बाळासाहेब गुंजाळ, प्रा.गभाले यांनी प्रयत्न केले.बी. एस.टी.महाविद्यालय आणि भाऊसाहेब गुंजाळ पाटील सह्याद्री ज्युनिअर कॉलेजचे सर्व शिक्षक,शिक्षकेतर कर्मचारी वृंद यांच्या सह विद्यार्थी मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

# बुके नको पुस्तके द्या- बिरदेव ढोणे

## हिवरगाव पावसा ग्रामस्थांनी केला ढोणे यांचा सत्कार

**संगमनेर । नितीनचंद्र भालेराव**

कोल्हापूर जिल्ह्यातील कागल तालुक्यातील यमगे या लहानशा गावातील बिरदेव सिद्धाप्पा ढोणे याने आपल्या जिद्द आणि चिकाटीच्या जोरावर आयपीएस अधिकारी होण्याचा मान मिळवला आहे. यूपीएससी २०२४ च्या परीक्षेत त्यांनी ५५१ वा क्रमांक मिळवून यश संपादन केले.

विशेष म्हणजे, तो आपल्या तालुक्यातील पहिला आयपीएस अधिकारी असून एका मेंढपाळ कुटुंबातील आहे. कठोर मेहनत,चिकाटी आणि आत्मविश्वासाच्या जोरावर कुठलेही शिखर गाठता येते,हे बिरदेव ढोणे याने दाखवून दिले. संगमनेर तालुक्यातील हिवरगाव पावसा ग्रामस्थांनी अशा कर्तृत्ववान बिरदेव ढोणे यांच्या गावी जाऊन सत्कार केला. यावेळी भाजपा तालुका उपाध्यक्ष गणेश दवंगे, शिवसेना (शिंदे) मागासवर्गीय सेल जिल्हाध्यक्ष सोमनाथ भालेराव, भाजपा कार्यकर्ते केशव दवंगे, सोमनाथ दवंगे यांच्यासह इतर कार्यकर्त्यांनी यमगे



या गावी जाऊन बिरदेव ढोणे यांची भेट घेऊन सत्कार केला. हिवरगाव पावसा येथील कार्यकर्त्यांनी विधान परिषदेचे उपसभापती प्रा.राम शिंदे यांच्याबरोबर व्हिडिओ कॉल करून संवाद साधला.

उपसभापती प्रा.राम शिंदे यांनी बिरदेव ढोणे यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा देत मेहनत व जिद्दीने संघर्षाबद्दल कौतुक केले. हजारो किलोमीटर दूर हिवरगाव पावसा येथून येऊन सत्कार केला,त्या सत्काराने बिरदेव ढोणे भारावले. हिवरगाव पावसा ग्रामस्थान बरोबर चर्चा करताना बिरदेव म्हणाले की, बाबासाहेबांच्या विचारांच्या प्रेरणामुळे खडतर परिस्थितीवर मात करून मी हे यश संपादन केले आहे.डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचा एक कोट आहे,तुम्ही गरिबीत जन्मला,हा तुमचा दोष नाही. पण गरिबीत मेलात,हा तुमचा दोष आहे. प्रयत्नांची पराकष्ठा केली, तर संधीचे सोने करून यश प्राप्त करू शकतात. माझ्यासारखा मेंढपाळाचा मुलगा करू शकतो,तर तुम्हीही करू शकतात. गावाकडच्या मुलांनी कोणत्याही गोष्टीला घाबरून न जाता,आपले प्रयत्न आणि चिकाटी ठेवली तर सगळ्या गोष्टी साध्य करणे सोपे आहे, असा संदेश बिरदेव याने तरुणांना दिला.

बिरदेव ढोणे यांनी सांगितले की मान्यवरांनी बुके देऊन सत्कार करण्यापेक्षा मला पुस्तक द्यावीत. ते पुस्तके स्पर्धा परीक्षेचा अभ्यास करणाऱ्या गरीब विद्यार्थ्यांसाठी उपयुक्त ठरतील असे अपेक्षा व्यक्त केली.

# जागतिक कामगारांचा हक्काचा १ मे दिवस



१ मे हा दिवस जागतिक कामगार दिन म्हणून संपूर्ण जगात साजरा केला जातो. जगभरातील कामगारांचा गौरव करण्यासाठी हा दिवस साजरा केला जातो. केवळ भारतातच नाही तर जगभरातील ८० हुन अधिक देशात या दिवशी सार्वजनिक सुट्टी जाहीर करण्यात येते. १९ व्या शतकात झालेल्या औद्योगिक क्रांतीनंतर जगभरातील कामगारांना रोजगार मिळू लागला. रोजगार मिळाला पण कामगारांची पिळवणूक मात्र वाढली. कोणत्याही सुविधा न देता तुटपुंजी मजुरी देत कामगारांना १२ ते १४ तास राबवून घेण्यात येऊ लागले. त्यामुळे कामगारात असंतोष निर्माण झाला. या असंतोषातूनच कामगार एकत्र आले व कामगार संघटनांची निर्मिती झाली. या संघटनांनी कामगारांची पिळवणूक थांबवण्यासाठी काही ठराव केले. त्या ठरावात केलेल्या प्रमुख मागण्या

१) कायद्याने आठ तासांचा दिवस
२) लहान मुलांना कामावर लावण्यास बंदी
३) महिला कामगारांच्या कामावर मर्यादा
४) रात्रीचे व धोक्याचे काम यासाठी खास नियम
५) कायद्याने साप्ताहिक सुट्टी
६) कामाचा मोबदला वस्तूरूपाने न देता नगद द्यावा
७) समान कामासाठी समान वेतन

या मागण्या २१ एप्रिल १८५६ रोजी ऑस्ट्रेलियातील कामगारांकडून करण्यात आल्या. ऑस्ट्रेलियातील कामगारांच्या मार्गाने जात अमेरिका व कॅनडातील संघटनांनी १ मे १८८६ रोजी मोर्चे व धरणे आंदोलनाची सुरवात केली. अशाच एका मोर्चाला पांगवताना ४ मे १८८६ रोजी झालेल्या गोळीबारात १ आंदोलनकारी ठार झाला. त्याचा निषेध म्हणून जगभरातील कामगार संघटना रस्त्यांवर उतरल्या. त्यात एका अज्ञात व्यक्तीने पोलिसांवर बाँब टाकला. यात ८ पोलीस मृत्यू पावले, तर ५० पोलीस जखमी झाले. या घटनेच्या स्मरणार्थ १ मे १८८९ रोजी आंतरराष्ट्रीय आंदोलनाचे आयोजन करण्याची मागणी रेमंड लेविन याने पॅरिस येथे झालेल्या दुसऱ्या आंतरराष्ट्रीय परिषदेत केली. त्या परिषदेत १ मे १८९० हा दिवस जागतिक कामगार दिन म्हणून साजरा करण्याचे निश्चित झाले. १८९१ च्या दुसऱ्या परिषदेत १ मे हा जागतिक कामगार दिन म्हणून साजरा करण्याची औपचारिक घोषणा करण्यात आली. तेंव्हापासून १ मे हा जागतिक कामगार दिन म्हणून जगभरात उत्साहात साजरा केला जातो. १ मे हा दिवस आंतरराष्ट्रीय ऐक्याचा, स्वातंत्र्याचा, मानवाकडून मानवाचे होणाऱ्या पिळवणुकीचा अंत करण्याचा प्रतीक बनला आहे. १९०५ च्या १ मे या कामगार दिनाच्या पत्रिकेत लेनिनने लिहिले आहे, ‘‘ कामगार – कामगारात, राष्ट्रा – राष्ट्रात, धर्मा – धर्मात असणारे शत्रुत्व नष्ट करा. या शत्रुत्वाने फक्त लुटारुंचा आणि जुलूमशहांचा फायदा होतो. कारण ते कामगार वर्गातील अज्ञातावर आणि दुफळीवरच जगत असतात. ज्यू आणि ख्रिश्चन, फिन आणि स्वीडिश, आर्मेनीयम आणि तातार, पोलिश आणि रशियन, लॅटिन आणि जर्मन असे सारे भेदभाव विसरून समाजवादाच्या झेंड्याखाली आपण सारे आगेकूच करूया. सर्व देशातील कामगारांची ही ऐक्य शक्ती आंतरराष्ट्रीय समाजवादाची संघशक्ती १ मे ला आपल्या दलाची पाहणी करते आणि स्वातंत्र्य, समता आणि बंधुत्व यासाठीचा लढा निर्धाराने आणि अविचलपणे पुढे नेण्यासाठी आपले बळ संघटित करते.‘‘ लेनिनचा हा विचार घेऊन जगभरातील कामगार संघटना आज मार्गक्रमित करीत आहेत. आज जगभरातील कामगार संघटनांपुढे नवे आव्हाने आहेत. जागतिकीकरणाची लाट व २१ व्या शतकातील कामगारांचे प्रश्न, बदललेली परिस्थिती, मस्तवाल झालेले भांडवलदार या नव्या आव्हानांचा मुकाबला कामगार संघटनांना करावा लागणार आहे. काळाचे हे आव्हान कामगार संघटनांनी स्वीकारले पाहिजे. जनतेच्या जगण्याला व कामगारांच्या हक्काला मिळालेले हे आव्हान आहे. याचा मुकाबला संघटित व असंघटित कामगारांच्या एकजुटीनेच होऊ शकतो. कामगार एकजुटीचा विजय असो! जगभरातील कामगारांना कामगार दिनाच्या मनापासून शुभेच्छा!



**श्याम बसप्पा ठाणेदार**
दौंड, जिल्हा पुणे
९९२२५४६२९५

**समाजसंवाद**

# बदल्यांसाठी खोट्या नोटरी

## महिला शिक्षकांच्या बदल्यांना स्थगित कारवाई ही होणार

## आता सेवा पुस्तिकेत नोंद

**अहमदनगर । शफीक बागवान**

घटस्फोटीत,पारित्यक्ता या सवलतीखाली बदलीचा लाभ घेणाऱ्या शिक्षकांच्या अर्जांना जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागाकडून स्थगिती देण्यात आली आहे. तसेच खोट्या नोटरी करणाऱ्या शिक्षकांवर तात्काळ कारवाई होणार असल्याची माहिती राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार गट सामाजिक न्याय विभाग तालुका अध्यक्ष चंद्रशेखर पंचमुख यांनी दिली आहे. घटस्फोटीत, पारित्यक्ता या सवलती खाली संवर्ग एक मध्ये बदलीचा लाभ घेण्याकरिता अर्ज करणाऱ्या सर्व शिक्षकांची सत्यता तपासणी करून त्यांची माहिती नोंद सेवा पुस्तकात घ्यावी व खोट्या शिक्षकांवरती कारवाई करावी, या मागणीसाठी पंचमुख यांनी प्राथमिक शिक्षणाधिकारी भास्कर पाटील यांना निवेदन दिले होते. या निवेदनाची दखल घेऊन सर्व शिक्षकांच्या अर्जांना स्थगिती देण्यात आली असून जे दोषी शिक्षक असतील त्यांच्यावर तात्काळ कारवाई करण्यात येईल. जिल्ह्यात अनेक महिला शिक्षकांनी संवर्ग एकमध्ये घटस्फोटीत व पारित्यक्ता या सवलतीचा लाभ घेण्याकरिता खोट्या नोटरी करून प्रतिज्ञापत्र दिलेले आहे.फक्त नोटरीच्या आधारे बदलीचा लाभ यापूर्वी घेतला असून आत्ताही अशाच प्रकारचा लाभ घेण्याचा प्रयत्न करत आहे. बदली करिता सोपा पर्याय म्हणून हा मार्ग सर्रास निवडला जातो तसेच आता होणाऱ्या बदल्या करिता मोठ्या प्रमाणात असे अनेक शिक्षकांनी नोटरी करून दिल्या आहेत या सर्वांची चौकशी करणे गरजेचे आहे. या सर्वांनी फक्त बदली लाभा करिता घटस्फोटीत व पारित्यक्ता असल्याचे वकीलामार्फत खोट्या नोटऱ्या केल्या आहेत. ज्या घटस्फोटीत महीला आहेत व पतीने सोडून दिले असे दाखवतात प्रत्यक्ष त्याच शिक्षिका पतीबरोबर राहतात पैशाचा आर्थिक व्यवहार होतो पती-पत्नीला सोडायला व घ्यायला येतो. दोघेही सोबत राहतात.याचे बँकेचे खातेही पतीच्या नावानेच आहेत.अशा सर्व घटस्फोटीत व पारित्यक्ता ची कसून चौकशी व्हावी त्यांची शहानिशा व्हावी.या शिक्षिका अशा प्रकारे धाकदपटशाहीने हक्क दाखवून लाभ घेतात. यामागे अधिकारी वर्गाचा त्यांना आशीर्वाद आहे. अशा प्रकारे फक्त नोटरी वरून बदल्या होऊ लागल्या तर संवर्ग एक मध्ये मोडणाऱ्या खऱ्या लाभधारकांवर अन्याय होईल.या महिला शिक्षिका शासनाची फसवणूक करतात. याकरिता या सर्वांची निपक्षपातीपणे चौकशी करून कागद पत्र पाहून दोषीवर तात्काळ गुन्हे दाखल करावे, अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली होती.



# १० व्या शतकातील आर्यादी श्री जनार्दन मंदिराचे नव्याने साकारत आहे स्वरूप

## भव्य कलशोत्सव १६ ते २० मे दरम्यान









**मुंबई । गुरुदत्त वाकदेकर**

भारतीय संस्कृतीत मंदिरे केवळ भक्तीची केंद्रे नसून ध्यानसाधना व गुरुकुल शिक्षणाचीही शक्तिपीठे मानली जात. उडुपी (कर्नाटक) जिल्ह्यातील पंगाला, कापू येथे असलेल्या १०व्या शतकातील आर्यादी श्री जनार्दन मंदिराचे जिर्णो द्धार कार्य अंतिम टप्प्यात असून, नव्या रूपाने हे मंदिर पुन्हा भक्तांसाठी खुलं होण्याच्या तयारीत आहे.

या ऐतिहासिक मंदिराच्या जिर्णो द्धारानंतर १६ ते २० मे २०२५ या कालावधीत भव्य कलशोत्सव सोहळा आयोजिला जाणार आहे. वेदमूर्ती श्री पदिगरु श्रीनिवास तंत्री यांच्या मार्गदर्शनाखाली होणाऱ्या या सोहळ्यासाठी डॉ. पी. मोहनदास भट, पी. गोविंद शेट्टी, बाळकृष्ण टी. शेट्टी तसेच अनेक मान्यवर मंडळी परिश्रम घेत आहेत. माधव विजय पर्व तसेच दंडतीर्थ या गुरुकुल परंपरेतील उल्लेखांमध्ये या मंदिराचा गौरवशाली उल्लेख आढळतो. मंदिरातील जनार्दन मूर्तीच्या स्पर्शाने व्याधी निवारण व मनः शांती प्राप्त झाल्याच्या अनेक घटना भाविकांकडून सांगितल्या जातात. त्यामुळे भक्तांच्या वतीने हा सोहळा अत्यंत श्रद्धेने साजरा करण्यात येत आहे.

देणगीदार व भाविकांना या पवित्र कार्यात सहभागी होण्याचे आवाहन आयोजकांनी केले आहे. द्वैत तत्वज्ञानाचे संस्थापक माधवाचार्य यांनी उडुपी श्रीकृष्ण मंदिर स्थापन केल्यानंतर पांगालाच्या नदीकाठच्या नैसर्गिक व सांस्कृतिक वारशाचे महत्त्व ओळखून येथे आर्यादी श्री जनार्दन मंदिर उभारले. दंडतीर्थ गुरुकुल पद्धतीमुळे या भागात अनेक विद्वान घडले. दाक्षिणात्य वास्तुशैलीतील या मंदिरात गर्भगृह, सभामंडप, गोपुरम यांचा सुंदर समावेश आहे.

मंदिरातील जनार्दन मूर्तीच्या तेजस्वी रूपामुळे भक्तांमध्ये अनोखा श्रद्धाभाव निर्माण होतो. मंदिर परिसर स्वच्छ, शांत व निसर्गरम्य आहे, जे ध्यानधारणा व प्रार्थनेसाठी आदर्श वातावरण प्रदान करते. आजही हे मंदिर गावाच्या सामाजिक व धार्मिक जीवनाचा केंद्रबिंदू आहे. स्थानिक लोक मंदिराच्या व्यवस्थापनात तसेच विविध उत्सवांच्या आयोजनात सक्रिय सहभाग घेतात. मंदिरदर्शनासोबतच कापू बीच, उडुपी श्रीकृष्ण मंदिर, माल्पे बीच आणि पांगाला नदीकिनाऱ्याचे सौंदर्यही अनुभवता येते. जनार्दन हे भक्तांचे रक्षक व कल्याणकारी देव मानले जातात आणि त्यांच्यासोबत अनेक अन्य देवतांचीही येथे पूजा केली जाते. ‘‘आर्यादी‘‘ हा शब्द स्थानिक इतिहासाशी किंवा विशिष्ट परंपरेशी संबंधित असण्याची शक्यता आहे. पांगाला परिसरातून वाहणाऱ्या स्वर्णा व सीता नद्यांमुळे या भागाचे नैसर्गिक सौंदर्य आणखी खुलते. येत्या भव्य कलशोत्सवासाठी सर्व भक्तांनी व देणगीदारांनी आपली उपस्थिती व सहकार्य यांची नोंद करून या ऐतिहासिक सोहळ्याचा भाग व्हावे, असे आवाहन आयोजकांकडून करण्यात आले आहे.

# शिवसेना जिल्हा उपाध्यक्षपदी मनोहर पोटे



**श्रीगोंदा । माधव बनसुडे**

आगामी जिल्हा परिषद पंचायत समिती व नगरपालिका निवडणुक लक्षात घेऊन श्रीगोंदा तालुक्यात शिवसेना वाढवण्यासाठी नुकतेच कॉग्रेस पक्षाचा राजीनामा देऊन शिवसेनेत प्रवेश केलेल्या माजी नगराध्यक्ष मनोहर पोटे यांना उपजिल्हाप्रमुख पदाची जबाबदारी देण्यात आली.

त्यांना राज्य परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांच्या हस्ते नियुक्ती पत्र देण्यात आले.
यावेळी राज्य परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांचा हिंदुत्वाचा विचार आणि धर्मवीर आनंद दिघे यांची शिकवण याचा आपण सक्रीयपणे प्रचार आणि प्रसार कराल तसेच शिवसेना पक्ष वाढीसाठी आपण सर्वांना सोबत घेऊन कार्य कराल असा विश्वास व्यक्त करुन त्यांचे अभिनंदन केले व पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

यावेळी बोलताना नुतन उपजिल्हाप्रमुख मनोहर पोटे म्हणाले शिवसेना पक्षप्रमुख व उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी माझ्यावर विश्वास ठेवून दिलेली जबाबदारी यशस्वीपणे पार पाडुन जिल्हात शिवसेना बळकट करुन त्यांनी दाखवलेल्या विश्वासाला तडा जाऊ देणार नाही.

## फलक रेखाटन




### १ मे महाराष्ट्र दिन व कामगार दिन

१ मे हा दिवस महाराष्ट्र दिन म्हणून ओळखला जातो. या दिवशी महाराष्ट्र राज्याची स्थापना झाली. १ मे १९६० रोजी मुंबई राज्याचे विभाजन होऊन मुंबई व गुजरात ही दोन राज्य तयार झाली. हा दिवस मराठी भाषिक लोकांच्या अस्मितेचा व अभिमानाचा दिवस आहे. तसेच १ मे हा दिवस आंतरराष्ट्रीय कामगार दिन म्हणून साजरा होतो. कामगारांचा सन्मान,एकता, आणि त्यांच्या अधिकारांच्या सन्मानार्थ हा दिवस साजरा केला जातो. शालेय दर्शनी फळ्यावर रंगीत खडू माध्यमातील फलक रेखाटणातून महाराष्ट्राच्या तमाम मराठी भाषिकांना तसेच कामगार वर्गास महाराष्ट्र दिन व कामगार दिनाच्या हार्दिक शुभेच्छा !

**फलक रेखाटन–**
**देव हिरे, कलाशिक्षक , शिक्षण मंडळ भगूर संचालित,**
**नूतन माध्यमिक विद्यालय भाटगाव. ता.चांदवड. जि.नाशिक**

Friends of Rayat Samachar
इंडी जर्नल वाचण्यासाठी
QR code scan करा

# गितांजली मडके ठरली २०२५ ची सर्वोत्तम विद्यार्थीनी

**शेवगाव । नरहरी शहाणे**




ता. २९ एप्रिल २०२५ रोजी प्रवरा शैक्षणिक संकुलाचे आयुर्वेद महाविद्यालय व श्री एकनाथ आयुर्वेद रुग्णालय शेवगाव,येथे महाविद्यालय आयोजित वार्षिक स्नेहसंम्मेलनामध्ये सर्वोत्तम विद्यार्थी पुरस्कार २०२५ साठी प्रवरा मेडीकल ट्रस्टचे आयुर्वेद महाविद्यालय, शेवगाव ची विद्यार्थीनी कु. गितांजली अप्पासाहेब मडके , चतुर्थ वर्ष बी. ए. एम. एस. हिची निवड झाली . हा पुरस्कार मा.गुरुवर्य प्रा. शि. पवार सर, प्रवरा मेडीकल ट्रस्टचे आयुर्वेद महाविद्यालय , शेवगाव चे संचालक मा. पंजाबराव आहेर सर,प्रवरा मेडीकल ट्रस्टचे आयुर्वेद महाविद्यालय , शेवगाव चे प्राचार्य डॉ. संतोष पवळे सर यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला . याप्रसंगी चतुर्थ वर्ष समन्वयक डॉ. सुमेध वासनिक सर , अकॅडमीक इन्चार्ज डॉ.रेणुका सूर्यवंशी मॅडम आणि सर्व प्रथम वर्ष ते चतुर्थ वर्ष बी. ए. एम. एस. च्या गुरुजनांकडून गितांजली चे अभिनंदन करण्यात आले. तसेच समस्थ गदेवाडी ग्रामस्थांच्या वतीने देखिल अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा देण्यात आल्या.

गितांजलीला मिळालेल्या सर्व यशाचे श्रेय गितांजलीने तिचे आई-वडील, भाऊ , कुटुंब, संपूर्ण गाव ,शाळेपासून तर कॉलेजपर्यंतच्या सर्व आदरणीय शिक्षक वृंदांना व कायम सपोर्ट करणाऱ्या सीनियर्स व बॅचमेट्सला दिले. ‘आज मी जे काही आहे ते सर्व माझ्या आई-वडिलांच्या पुण्याईमुळे व माझ्या शिक्षक वृंदांच्या आशीर्वादामुळेच आहे‘ अशा तिच्या बक्षीस स्वीकारताना भावना होत्या हे तिने नमूद केले. आयुष्यात वाट्याला आलेल्या संघर्षात सर्वांचे आशीर्वाद मला मिळावे व कार्य करण्याची शक्ती मिळावी, हीच ईश्वरचरणी प्रार्थना ,असे बोलून गितांजलीने सर्वांप्रति मनोभावे कृतज्ञता व्यक्त केली. ‘‘उडत्या पाखराला परतीची तमा नसावी, नजरेत सदा नवी दिशा असावी, घरट्याचे काय आहे बांधता येईल केव्हाही,परंतु क्षितिजा पलीकडे झेप घेण्याची जिद्द असावी.‘‘ वरील चारोळीचे पालन करून, प्रत्येक गोष्टीत मेहनत करत व उत्तुंग भरारी आमच्या गावच्या कन्येने घ्यावी अशीच आमच्या सर्व गदेवाडी ग्रामस्थांची इच्छा आहे. याप्रसंगी संपूर्ण गदेवाडी ग्रामपंचायत गितांजलीचे मनापासून अभिनंदन करत आहे.